# टिपणीसांचा कॅन्सर

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०४–०८–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

अध्यात्म-विज्ञान जगणारे एक साधक श्रीयुत टिपणीस, वय वर्षं अडुससष्ट, विदेशी कंपनीतील उच्च पदावरून रिटायर्ड झाले होते. नामस्मरणाच्या ब्रह्मत्रयीत ते पूर्णत: रमलेले आणि आनंदी असत. जानेवारी दोन हजार नऊला सर्वांगाला सूज येऊ लागली म्हणून सात फेब्रूवारीला ते डॉक्टर उपाध्ये यांच्याकडे गेले. डॉक्टरांनी ब्लड टेस्ट, एक्स्–रे आणि पेट सी.टी.स्कॅन करायला सांगितला. रिपोर्टमध्ये उजव्या फुफ्फुसाचा साधारण पावणे तीन x पावणे तीन x अडीच इंचाचा भाग कॅन्सरने ग्रासलेला आढळला. शिवाय पित्ताशय आणि मूत्रपिंडालाही कॅन्सरची लागण झाल्याचं लक्षात आलं. डॉक्टरांनी कॅन्सरची 'फोर्थ स्टेज' (अंतिम स्थिती) असल्याचं सांगितलं. सुश्रुषा हॉस्पिटलमध्ये कॅन्सर स्पेशालिस्ट डॉक्टर बोमन धाभर यांच्या मार्गदर्शनाखाली इलाज करायचं ठरलं. डॉक्टर बोमन यांनी सहा केमोथेरपीचा इलाज करण्याचं ठरवलं. ''या इलाजाने तुम्ही नेमकं काय साधणार आहात?'' असा स्पष्ट प्रश्न टिपणीसांनी विचारताच डॉक्टर म्हणाले ''केवळ तुमचं दुखणं सुसह्य करणार.'' डॉक्टरांनी पहिल्या केमोची तारीख ठरवली. टिपणीस माझ्याकडे आले आणि त्यांनी मला विचारलं ''मी आनंदात आहे. फार तर उद्या जायचं ते आज जाईन. मग केमो कशाला घेऊ?'' ''एवढा पैसा कमावून स्वत:साठी एकही पैसा खर्च केला नाही आणि कॅन्सरच्या शेवटच्या अवस्थेत तुम्ही जराही सेवा करून घेतली नाही, ही खंत आयुष्याभर तुमच्या बायकोला आणि मुलांना लागेल. तेव्हा त्यांच्या समाधानासाठी केमो घेणं आवश्यक आहे,'' असं मी त्यांना सांगितलं. पहिल्या केमो नंतर टिपणीस माझ्याकडे आले. ''तीन दिवस तेरा तेरा तास केमो घेताना मजा आली, सलाईनचा प्रत्येक थेंब अगदी लयीत पडत होता, त्या लयीत नाम मस्त झालं,'' असं ते म्हणाले. अमेरिकेत असलेल्या मुलाने आणि सिंगापूरमध्ये असलेल्या मुलीने टिपणीसांच्या रिपोर्ट संदर्भात डॉक्टरांकडून आणि नेट वरून माहिती मिळवली. बाबांना कशा अवस्थेत पाहावं लागणार, या दडपणाखाली ते भारतात आले. त्यांना आनंदी आणि उत्साही पाहून दोघांनाही आश्चर्याचा सुखद धक्का बसला. बाबांच्या मन:सामर्थ्यावर आणि देवावर त्यांची पूर्ण श्रद्धा बसली. प्रत्येक केमो पूर्वी एक्स्–रे काढला जात होता. नुकत्याच झालेल्या चौथ्या केमो नंतरच्या एक्स्–रे प्रमाणे लंग्ज फील्ड, हार्ट ॲण्ड ऑर्टा, बोनी थोरॅक्स सारं नॉर्मल झालं आहे. 'इटस् अ मिरॅक्युलस रिकव्हरी' डॉक्टर बोमन उद्‌गारले. चौथ्या स्टेजचा कॅन्सर कोणताही त्रास न होता, कोणतीही रिॲक्शन न येता पाच महिन्यात बरा झाल्याचं अनुभवलं असं टिपणीसांचं म्हणणं आहे.